# द्राक्ष पिकातील अन्नद्रव्य, पाणी व्यवस्थापन

**डॉ. अजयकुमार उपाध्याय, युक्ती वर्मा**

गेल्या दोन दिवसांपासून प्रत्येक भागात पाऊस झाला आहे. त्यामुळे वातावरणातील आर्द्रता तितक्याच प्रमाणात वाढली. जमिनीमध्ये पाणी खोलपर्यंत गेल्यामुळे काही ठिकाणी वाफसाही नसेल. तर काही ठिकाणी दोन ओळींच्या मध्यभागी असलेल्या साचलेल्या पाण्यामुळे आता पांढरी मुळे कार्यक्षम होताना दिसतील. परिणामी, वेलीची वाढ जोमात होईल. सूक्ष्मघडनिर्मितीचा कालावधी असलेल्या बागेमध्ये पाणी बंद करणे महत्त्वाचे असेल. मात्र ओलाव्यामुळे पाण्याच्या कमतरतेचे वेलीमध्ये कोणतेही लक्षण दिसणार नाही. हलक्या जमिनीमध्ये येत्या तीन ते चार दिवस पाणी देऊ नये. भारी जमिनीत पाच ते सहा दिवस पाणी देण्याची गरज नसेल. पुढील दोन ते तीन दिवसांत पुन्हा हलका पाऊस झाल्यास आणि वाफसा स्थिती नसल्यास पुन्हा दोन ते तीन दिवस पाणी बंद करावे. अन्यथा, याचे परिणाम सूक्ष्मघडनिर्मितीवर होऊ शकतील.

- पुढील आठवड्यात कोणत्याही प्रकारचे नत्रयुक्त खत देऊ नये. त्याचा वापर केल्यास वेलीचा जोम जास्त वाढून पेऱ्यातील अंतर वाढेल.
- ज्या बागेत पाच मि.मी.पेक्षा जास्त पाऊस झाल्यास अशा ठिकाणी पोटॅश ३ ते ४ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी.
- चुनखडीचे प्रमाण अधिक असलेल्या बागेचे योग्य व्यवस्थापन या पूर्वी केलेले नसल्यास या वेळी पानाच्या दोन शिरांमधील भाग पिवळसर दिसून येईल. यालाच इंटरव्हेनल क्लोरोसीस असे म्हणतात. ही परिस्थिती लोहच्या (फेरस) कमतरतेमुळे तयार होते. यासाठी फेरस सल्फेट २ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे दोन ते तीन फवारण्या तीन दिवसांच्या अंतराने कराव्यात. तसेच ठिबकद्वारे १५ फेरस सल्फेट प्रति एकर या प्रमाणे द्यावे. फवारणीच्या द्रावणाचा सामू ५.५ ते ६ पर्यंत ठेवावा. यासाठी सायट्रिक ॲसिडचा वापर करता येईल.
- विद्राव्य सल्फर ३ ते ५ किलो प्रति एकर ठिबकद्वारे आठवड्यातून एकदा या प्रमाणे जमिनीचा सामू योग्य पातळीपर्यंत येईपर्यंत द्यावे.

**डॉ. अजयकुमार उपाध्याय,**
**९८९००७७७२१**
**राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र,**
**मांजरी, जि. पुणे**